## - व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत -

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार दि.२७/१२/०७ रोजी सकाळी ११-२० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे | सदस्या |
| ३) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी शिक्षण सहसंचालक कोल्हापूर डॉ. बी. बी. कदम | सदस्य |
| ५) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. पी. बी. जोशी, प्र.संचालक, म. व वि.वि.मं. - पदसिध्द | सदस्य |
| ७) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ९) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १०) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ११) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| १२) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १३) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १४) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १५) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १६) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १७) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक तथा प्र.कुलसचिव | स्थायी निमंत्रित तथा सचिव |

सभेच्या सुरुवातीला प्र.कुलसचिव यांनी मा.कुलगुरु आणि सर्व सन्माननीय व्यवस्थापन परिषद सदस्यांचे स्वागत केले. मा.कुलगुरु डॉ. बी. पी. बंडगर यांच्या कुलगुरुपदावरील नियुक्तीबाबत सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून केलेल्या कार्याचे कौतुक केले.

मा.कुलगुरु डॉ. बी. पी. बंडगर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. दि.२६/१२/२००७ रोजी रात्री ८ वा. वर्षा बंगल्यावर मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत झालेल्या सभेबाबत खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**विषय :** **मा.ना.विलासराव देशमुख, (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. ना. सुशीलकुमार शिंदे (केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार) यांच्यासमवेत मा.कुलगुरु प्रा. डॉ. बी. पी. बंडगर यांची दि.२६/१२/०७ रोजी वर्षा बंगला (मुख्यमंत्री निवास, मुंबई) येथे झालेल्या बैठकीबाबत.**

**ठराव :** **मा.ना.विलासराव देशमुख, (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. ना. सुशीलकुमार शिंदे (केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार) यांच्यासमवेत मा.कुलगुरु प्रा. डॉ. बी. पी. बंडगर यांची दि.२६/१२/०७ रोजी वर्षा बंगला (मुख्यमंत्री निवास मुंबई) येथे रात्री ८ वा. झालेल्या बैठकीमध्ये विधायक चर्चा झाली आणि मा.मुख्यमंत्री यांनी विद्यापीठाने सादर केलेल्या कामांची लवकरात लवकर पूर्तता**

करण्यासाठी संबंधितांना आदेश दिले. याबद्दल ही व्यवस्थापन परिषद मा.ना.विलासराव देशमुख, (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा.ना.सुशीलकुमार शिंदे (केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार) आणि कुलगुरु मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर यांचे अभिनंदन करते.

सदर ठराव प्रा. बी. पी. रोंगे यांनी मांडला आणि त्यास प्रा. एन. बी. पवार यांनी अनुमोदन दिले.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र. १ दि.८ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र.१ दि. ८ ऑक्टोबर २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.

१) पान क्र. ३ वर, ठराव क्र. १ मधील क्र. ६ मध्ये "यासंदर्भात विद्यापीठात संकुल प्रणालीप्रमाणे अभ्यासक्रमाचा फेरबदल विचाराधीन असल्याने सदरचा विषय अनुदानित तत्वावर मागण्यात यावा" असा समावेश करावा.

२) पान क्र. ३ वर, ठराव क्र. २ मध्ये, ओळ क्र. ४ मधील, "व त्याबाबत सदस्यांचे संपूर्ण समाधान केले" हे शब्द वगळून "अ) पान क्र. ११ वर, प्रशासकीय विभागाच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ४ मधील "प्रगतीपथावर" ऐवजी "चालू" अशी दुरुस्ती करण्यात यावी"."ब) तसेच पुरवणी अहवालावर मा. सदस्यांनी तारीखवार विचारलेली सर्व माहिती व कागदपत्रे मा.अध्यक्षांनी वाचून दाखविली"."क) तसेच CAS चा संपूर्ण अहवाल मागवून सादर केला त्याची नोंद घेतली. पुढील कार्यवाही त्वरीत करावी". पैकी अ) व क) सर्वानुमते मान्य करुन ब) बाबत व्यवस्थापन परिषदेच्या खालील सदस्यांनी असहमती नोंदविली.

१) श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे
२) डॉ.डी.डी. रणनवरे
३) प्राचार्य डॉ.सी.बी.कोळेकर
४) प्रा. बी. पी. रोंगे
५) प्राचार्य जे. के. बिले
६) ॲड. रामदास पी. सब्बन
७) डॉ. एल. पी. देशमुख
८) प्रा. व्ही. तिरुपती

३) पान क्र. ११ वर, ठराव क्र. २३ मध्ये, ओळ क्र. ३ मध्ये, अभ्यासक्रमाच्या या शब्दानंतर "संलग्नीकरणाचा" आणि विस्ताराचा या शब्दानंतर "प्रस्ताव" या शब्दांचा समावेश करावा.

**विषय क्र. २** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**( सोबत अहवाल जोडला आहे.)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर केलेला अहवाल खालील दुरुस्त्यांसह मान्य करावा असे ठरले.**

**१) पान क्र. २२ वर, विद्यार्थी कल्याण मंडळाच्या माहितीतील ओळ क्र. ६ मधील, "कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरु प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांनी भूषविले" हे वाक्य वगळावे तसेच या पानावरील शेवटच्या ओळीतील "काकासाो" हा शब्द वगळावा.**

**२) पान क्र. २३ वर, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माहितीतील, ओळ क्र. ६ मधील सोलापूर या शब्दानंतर "व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर" या शब्दांचा समावेश करावा.**

**३) पान क्र. २५ वर, सेमिनार विभागाच्या माहितीतील, ओळ क्र. ४ मधील "शिफारशी व मा.कुलसचिव व" हे शब्द वगळून "शिफारशीस" या शब्दाचा समावेश करावा.**

**४) पान क्र. २६ वर, ओळ क्र. ६ मध्ये, "व एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स" हे शब्द वगळावेत. "२५ व ६०" हे शब्द वगळून "२५ वरुन ६०" आणि "विभागाची" हा शब्द वगळून "अभ्यासक्रमाची"अशी दुरुस्ती करावी.**

**५) पुरवणी १ अहवालामध्ये, "वार्षिक अहवाल" हे शब्द वगळावेत. तसेच क्र. २ मध्ये, "नेमचे" हा शब्द वगळून "स्टाफचे" अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. ३** **माहे जानेवारी २००८ मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभात पदव्या, पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.**

(टिपणी :- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अंतर्गत कलम ९६(१) नुसार पदव्या, पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"The Management Council may institute and confer such Degrees / Diplomas Cerfificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council."

या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस अशा पदव्या, पदविका प्रमाणपत्रे देण्याबाबत शिफारस करावयाची असते. जे स्नातक पदव्या, पदविका प्रमाणपत्रे घेऊ इच्छितात अशा स्नातकांची यादी सोबत जोडली आहे. दिनांक १४ डिसेंबर, २००७ रोजी विद्यापरिषदेच्या झालेल्या सभेत विषय क्र. ६४ वरील झालेला ठराव खालील प्रमाणे आहे.

**ठराव :- "ही विद्यापरिषद व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, पात्र स्नातकांना पदव्या / पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यास अनुमती द्यावी. "**

सदरची शिफारस मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र. ३** **पात्र स्नातकांना पदव्या/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ४ प्रवेश परीक्षा फी शुल्काबाबत सुसूत्रता आणण्याबाबतचे मा. श्री. सी. एम. आलेगांव मा. कुलपती यांचे उपसचिव यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोबत प्रवेश फी शुल्कामध्ये सुसूत्रता आणण्याबाबतचे मा. श्री. सी. एम. आलेगांव, मा. कुलपती यांचे उपसचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२ यांचे आणि श्रीमती एन. एस. दिघे, अध्यक्ष, कॉलेज ॲन्ड युनिव्हर्सिटी टीचर्स वेल्फेअर्स असोसिएशन, कल्याण यांचे पत्र जोडले आहे.

श्रीमती एन.एस. दिघे यांनी त्यांच्या पत्रात, विविध विद्यापीठाकडून प्रवेश शुल्क वेगवेगळे आकारण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर बोजा पडत आहे. विविध विद्यापीठाकडून आकारण्यात येणारे प्रवेश परीक्षा शुल्कामध्ये सुसूत्रता आणून सर्वच विद्यापीठामध्ये समान प्रवेश परीक्षा शुल्क आकारल्यास विद्यार्थ्यांवर बोजा पडणार नाही असे नमूद केले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ४ मा.कुलपतींचे उपसचिव श्री. सी. एम. आलेगांव आणि श्रीमती एन. एस. दिघे, अध्यक्ष, कॉलेज ॲन्ड युनिव्हर्सिटी टीचर्स वेल्फेअर्स असोसिएशन, कल्याण यांच्या पत्राची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ५ सोलापूर विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संकुल प्रणालीचा स्विकार करुन, तसे व्यवस्थापन परिषद व शासनास प्रस्तावित करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२) (e) नुसार विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी :-महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२) (e) अन्वये विद्यापरिषदेने दि. १४/१२/२००७ रोजीच्या सभेत आयत्या वेळेचा विषय क्र. ७६ नुसार सोलापूर विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संकुल प्रणालीचा स्विकार करुन तसे व्यवस्थापन परिषद व शासनास प्रस्तावित करणेबाबत केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र. ५ विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संकुल प्रणालीच्या प्रस्तावाची विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेने मान्य केली. तसेच या प्रस्तावातील पान क्र. ४६ वरील क्र. ४ मध्ये, School of Education आणि School of Life Sciences या संकुलांचा समावेश करण्याचे ठरले.**

**विषय क्र. ६ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३०(२)(अ) नुसार विद्यापरिषदेने खालील पदव्या स्थापनेबाबत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर..**

(टिपणी :- विद्यापरिषदेने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील ३०(२) (अ) नुसार खालील पदव्या स्थापनेबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | पदवीचे नाव | विद्यापरिषद सभा दिनांक | विषय क. |
|---|---|---|---|
| १. | Bachelor of Foreign Trade | ०५/०६/२००७ | ८३ |
| २. | B.Sc.B.Ed एकात्मिक | ०५/०६/२००७ | ९० |
| ३. | M.A.Education | १४/१२/२००७ | ४७ |
| ४. | Bachelor of Music (B.Music) | १४/१२/२००७ | ६७ |

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(न) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र.६** **विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी पदवींना दिलेल्या मान्यतेच्या यादीमध्ये उपरोक्तप्रमाणे क्र. १ ते ४ पैकी ज्या पदव्यांचा समावेश असेल त्यांना व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र.७** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२)(इ) नुसार विद्यापरिषदेने खालील अधिविभाग विद्यापीठामध्ये सुरु करण्याबाबतची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी :- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३०(२)(इ) नुसार विद्यापरिषदेने खालील अधिविभाग सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.

| अ.क्र | अधिविभागाचे नाव | विद्यापरिषद सभा दिनांक | विषय क्र. |
|---|---|---|---|
| १. | Music | ०५/०६/२००७ | ३ |
| २. | वाणिज्य व व्यवस्थापन | १८/०१/२००७ | ९७ आयत्या वेळेचा विषय |
| ३. | Geography & Geoinformatics | १८/०१/२००७ | १०२ आयत्या वेळेचा विषय |
| ४. | M.A.Education | १४/१२/२००७ | ५१ |

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील २८ (ब) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र. ७** **अ.क्र. १ ते ४ बाबत विद्यापरिषदेने म.वि.का. १९९४ कलम ३० (२) (इ) नुसार केलेल्या शिफारशीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ८** **संगणकशास्त्र विभागातील M.C.A.अभ्यासक्रमाअंतर्गत शिक्षकांची पदे U.G.C. ने शिफारस केलेल्या वेतन श्रेणी प्रमाणे भरण्यासाठी विद्यापरिषदेने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२)(f) व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ सादर.**

**(सोबत प्रस्ताव जोडला आहे.)**

(टिपणी :- संगणकशास्त्र विभागातील M.C.A. अभ्यासक्रमाअंतर्गत शिक्षकांची पदे U.G.C. ने शिफारस केलेल्या वेतन श्रेणी प्रमाणे भरण्यासाठी धोरणात्मक निर्णयाच्या शिफारशीबाबत विषय क्र. ७४ अन्वये दि. १४/१२/२००७ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत सादर करण्यात आला होता. याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(२)(f) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र. ८** **संगणकशास्त्र विभागातील M.C.A. अभ्यासक्रमाअंतर्गत शिक्षकांची पदे U.G.C. ने शिफारस केलेल्या वेतन श्रेणी प्रमाणे भरण्यासाठी विद्यापरिषदेने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२)(f) नुसार व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ९** **सोलापूर विद्यापीठामध्ये इंटरनेटच्या ब्रॉड (Broadband) ची कनेक्शन घेणे बाबत बी.एस.एन.एल. कडून आलेला प्रस्ताव विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठ व बी.एस.एन.एल. या मधील अंतराचा विचार करता विद्यापीठात Broadband connetion देणे तांत्रिक दृष्ट्या शक्य होत नव्हते. सबब, डी.जी.एम., बी.एस.एन.एल. यांचे बरोबर चर्चा झाले नंतर त्यांनी सदर कनेक्शन देते वेळी Optical Fiber (OFC) ही अंदाजे १ कि.मी. विद्यापीठामध्ये आणणे गरजेचे आहे असे कळविले सदर OFC आणत असताना फक्त Broadband साठी आणणे तांत्रिक दृष्ट्या योग्य होत नसून सदर केबल वर

Internet सुविधे बरोबरच Mobile Communication Tower उभारला जाणे गरजेचे आहे असे कळविले असून सदर कामासाठी त्यांना १०*१० ची रुम भाडे करारने हवी आहे. सदर ठिकाणी होणारा विद्युतपुरवठाचा खर्च नॉमिनिल रेट देण्यास बी.एस.एन.एल. कंपनी तयार आहे इतर इक्यीमेंट व OFC चा खर्च करण्यास कंपनी तयार आहे. सदर प्रकारची जागा ही भाडे तत्त्वावर करार करुन बी.एस.एन.एल. ला देणे बाबत सदर बाबत गरजेप्रमाणे योग्य ती जागा निश्चित करण्याचा अधिकार व्यवस्थापन परिषदेने मा. कुलगुरु यांना द्यावे इ. बाबत विचारार्थ.

(सोबत बी.एस.एन.एल. कंपनीकडून आलेले पत्र)

**ठराव क्र. ९** **ब्रॉडबॅन्ड किंवा लीज लाईन यामधील योग्य पर्याय निवडीबाबत मा.कुलगुरु यांना अधिकार देण्यात आले व बी.एस.एन.एल. बरोबर करार करणेस मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. १०** **व्यवस्थापन परिषदेच्या दि. ११/०४/२००७ रोजीच्या सभेतील ठराव क्र. १२ नुसार गठित केलेल्या चौकशी समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे.)**

(टिपणी :- व्यवस्थापन परिषदेच्या दि. ११/०४/२००७ रोजीच्या सभेतील ठराव क्र.१२ नुसार खालील विषयांची चौकशी करण्यासाठी

प्रा.व्ही तिरुपती -- अध्यक्ष

प्रा.बी.पी.रोंगे -- सदस्य

प्रा.एन.बी.पवार -- सदस्य

यांची समिती गठित केली होती.

१. महात्मा फुले मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास संस्था वाखरी, ता.पंढरपूर या संस्थेस बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली.
२. बी.ए.बी.एड. अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसताना मान्यता दिली.
३. शासन, व्यवस्थापन परिषद व शुल्क समितीची मान्यता न घेता बी.एड.चे शुल्क वाढविले.
४. वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील शिक्षक कर्मचाऱ्यांचे विद्यापीठामार्फत प्लेसमेंट झालेले आहे, ती कागदपत्रे महाविद्यालय परस्पर घेवून गेले.

सदर समितीने वरील विषयाची चौकशी पूर्ण केलेली असून त्याबाबतचा समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र. १०** **माजी कुलगुरुंना वगळून इतर ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केली आहे अशा व्यक्तींना मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत करावयाच्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची नैसर्गिक न्यायतत्वानुसार संधी देऊन त्या म्हणण्यासहीत अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. ११ सोलापूर विद्यापीठाने पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.**

टिपणी : सोलापूर विद्यापीठाने मनुष्यबळ पुरविण्यासाठी दै. सकाळ मधून दि.१७/११/०७ रोजी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्या अनुषंगाने एकूण ०६ ठेकेदाराकडून निविदा प्राप्त झाल्या होत्या. निविदा उघडयाच्या विहीत समितीने दि.५/१२/२००७ रोजी सर्व ठेकेदाराच्या समक्ष निविदा उघडयात आल्या. तद्नंतर उपलब्ध दरपत्रकांचा तक्ता तयार करण्यात आला.

मा.कुलगुरुंनी दिलेल्या आदेशाप्रमाणे दरपत्रक / कागदपत्रांची छाननी करण्यासाठी व्यवस्थापन परिषद त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीची बैठक दि. १९/१२/२००७ रोजी दु.३.०० वा. आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१. सागरलिला रोपवाटिका यांनी लेखी पत्रानुसार माघार घेतल्याने त्यांची निविदा विचारात घेतली नाही.
२. भंडारी कन्स्ट्रक्शन सर्व्हिसेस यांची निविदा किमान वेतनदराच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने त्यांची निविदा विचारात घेतली नाही.
३. आयडियल एन्टरप्राईजेस, सोलापूर यांचे दर न्यूनतम असल्याने यांना कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ पुरविण्याचे अहवालातील अटीसह शिफारस केलेली आहे तसेच आयडियल एन्टरप्राईजेस, सोलापूर यांच्याबरोबर दि.१/१/२००८ पासून ११ महिन्याकरीता करार करावा लागणार आहे. (सोबत अहवाल जोडला आहे.)

सबब, समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ११ पात्र ठेकेदारांकडून मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात मा.कुलगुरु यांनी निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले. तसेच मे. प्रायमा ग्रुप, सोलापूर यांना येथून पुढे कोणत्याही प्रकारचे कंत्राट देवू नये असे ठरले.**

**विषय क्र. १२ मल्टीक्लासरुम कॉम्पलेक्स इमारतीच्या बांधकामासाठी रु.५१,००,०००/- विद्यापीठाच्या फंडातून खर्च करण्याची बाब.**

मल्टीक्लासरुम कॉम्पलेक्स इमारतीच्या बांधकामासाठी सोलापूर महानगरपालिका रु.१.२८ कोटी निधी देणार आहे. आजतागायत या इमारतीच्या बांधकामासाठी रु.१.११ कोटी इतका खर्च झाला असून विद्यापीठाच्या फंडातून या कामासाठी रु.३०,००,०००/- खर्च करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने दि.२७/१२/२००५ ठराव क्र.६६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. मल्टीक्लासरुम कॉम्पलेक्स इमारतीचे बांधकाम थांबू नये म्हणून विद्यापीठाच्या फंडातून आणखी रु.५१,००,०००/- निधी खर्च झाला असून या बांधकामासाठी झालेल्या खर्चास व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. १२ सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करुन सदरचा विषय संपूर्ण तपशीलासह व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र.१३ मा.कुलगुरु यांच्या विस्तारित कार्यालयासाठी फर्निचर (अंतर्गत सजावटीचे) काम करुन घेण्यासाठी जादा झालेल्या खर्चाचे देयक रक्कम रु.२,२४,५८९/- श्री. राहूल दबडे अँड असोसिएट यांना अदा करण्याबाबत..**

कुलगुरु यांच्या विस्तारित कार्यालयासाठी फर्निचर (अंतर्गत सजावट) तयार करुन घेण्यासाठी रु.९,३५,०००/- इतक्या रकमेची टेंडर नोटीस देण्यात आलेली होती. सदर कामासाठी श्री.राहूल दबडे ॲन्ड असोसिएट, सोलापूर यांचे कमी दर असलेले टेंडर रक्कम रु.९,०२,५७२/- मंजूर करण्यात आलेले होते. सदर काम करताना रु.२,२४,५८९/- इतक्या रुपयांचे जादा काम झालेले आहे. त्याबाबत सविस्तर मोजमाप घेऊन तांत्रिक समितीने बांधकाम समितीस रु.२,२४,५८९/- राहूल दबडे ॲन्ड असोसिएट, सोलापूर यांना अदा करण्याबाबत शिफारस केलेली आहे. बांधकाम समितीने सदर खर्चास मंजूरी देवून व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी सादर करण्याचे ठरले.

**ठराव क्र. १३ सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करुन सदरचा विषय संपूर्ण तपशीलासह व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. १४ सोलापूर विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा गठीत समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी व विचारार्थ.**

टिपणी : -

संदर्भ क्र. १) शासन निर्णय क्र. एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५, दि.११ मे २००७

२) शासन निर्णय क्र. एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५, दि.४ ऑक्टोबर २००७

**अ)** उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार, १५० पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला. त्यामधील अनु. ३ नुसार, मंजूर ४१ शिक्षकेतर पदांपैकी रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने खालील कर्मचाऱ्यांना दि.२८/६/२००७ पासून पदोन्नती देण्याची शिफारस केली.

१) श्री. डी. एस. कांबळे - अधीक्षक पदी पदोन्नती.
२) श्री. एस. टी. काळे - सहाय्यक अधीक्षक पदी पदोन्नती.
३) श्री. एल. एस. कदम - वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती.
४) श्री. एम. डी. कर्नाळकर - वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती.

समितीच्या शिफारशीनुसार, उपरोक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ब)** उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ च्या शासन निर्णयानुसार, उर्वरीत पदोन्नतीसाठी पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत समितीने सादर केलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या **अ)** माहितीसाठी व मान्यतेसाठी **ब)** अहवाल विचारार्थ सादर.

ठराव क्र. १४ अ) मधील,

१) श्री. डी. एस. कांबळे - अधीक्षक पदी पदोन्नती.
२) श्री. एस. टी. काळे - सहाय्यक अधीक्षक पदी पदोन्नती.
३) श्री. एल. एस. कदम - वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती.
४) श्री. एम. डी. कर्नाळकर - वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती.

यांना पदोन्नती देण्याबाबत नियुक्त त्रिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

ब) पदोन्नती समितीच्या दि. २०/११/०७ रोजीच्या सभेच्या अनुषंगाने,

| अ.क्र. | सेवकाचे नांव | पदोन्नतीचे पद |
|---|---|---|
| १) | श्री. डी. एम. वलेकर | सहाय्यक अधीक्षक |
| २) | श्री. ए. एस. पाटील | सहाय्यक अधीक्षक |
| ३) | श्री. पी. एस. दीक्षित | वरिष्ठ लिपीक |
| ४) | श्री. एम. ए. पाटील | वरिष्ठ लिपीक |
| ५) | श्री. एल. बी. दळवे | वरिष्ठ लिपीक |
| ६) | श्री. व्ही. डी. पवार | वरिष्ठ लिपीक |
| ७) | श्री. एस. एम. क्षीरसागर | वरिष्ठ लिपीक |
| ८) | श्री. एस. बी. चौधरी | वरिष्ठ लिपीक |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ८ प्रमाणे सेवकांच्या नावांसमोर दर्शविलेल्या पदावर दि.४ ऑक्टोबर, २००७ पासून पूर्वलक्षीप्रभावाने पदोन्नती देण्याचे ठरले.

तसेच पदोन्नती समितीच्या दि.२६/९/०७ रोजीच्या सभेच्या अनुषंगाने, श्री. दिलपाके यु.जी. यांना अनुसूचित जाती प्रवर्गातून व श्री. राक्षे यु. ए. यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातून कनिष्ठ लिपीक पदावर सद्‌वर्तनाच्या व पदोन्नतीच्या नियुक्तीच्या तारखेपासून दोन वर्षाच्या काळात विहीत संगणक ज्ञानाची अर्हता प्राप्त करावी लागेल याबाबत कायदेशीर बाबींची पडताळणी करुन निर्णय घेण्याचे ठरले.

तसेच पदोन्नती समितीच्या दि.२०/११/०७ रोजीच्या सभेच्या अनुषंगाने, श्री. आर. जे. सावळगी यांना हवालदार पदावर दि.४ ऑक्टोबर, २००७ पासून पूर्वलक्षीप्रभावाने पदोन्नती देण्याचे ठरले आणि श्रीमती जे. एस. राख यांची शासन निर्णय क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१/१६-ब, दि.१३/३/२००६ च्या शासन निर्णयातील अ.क्र. ४ च्या नुसार मूळ याचिका क्रमांक ८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधीन राहून दि.४ ऑक्टोबर २००७ पासून प्रयोगशाळा परिचर या पदावर नियुक्ती करावी असे ठरले.

**विषय क्र. १५ विद्यापीठाकडील कार्यरत रोजंदारीवरील तृतीय श्रेणी व चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि मानसेवी कर्मचारी यांच्या वेतनवाढीबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठ नियुक्त रोजंदारीवरील तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांना प्रतिदिन रु.९७/- व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना रु.५६/- प्रमाणे दिले जाते. शासनमान्य दैनिक दर, अन्य विद्यापीठाचे दर आणि विद्यापीठ देत असलेल्या दरात तफावत आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी सदर नियुक्त समितीने वर्ग-३ करीता रु.१७५/- व वर्ग ४ करीता रु.१२०/- प्रतिदिन देण्याविषयी शिफारस केलेली आहे.

काही मानसेवी कर्मचारी विद्यापीठात कार्यरत आहेत. त्यांचा अनुभवांचा फायदा होत आहे. त्यांना रु.३०००/- व रु.५०००/- प्रमाणे मानधन देण्यात येते. सदर कर्मचाऱ्यांना समितीने सरसकट रु.१२५०/- वाढ देण्याची शिफारस केलेली आहे. रोजंदारी व मानधनावर दरमहा साधारणतः रु.७५,०००/- खर्च येतो. वरीलप्रमाणे

मंजूर झाल्यास दरमहा रु.१,२८,२००/- खर्च होईल. सोबत तक्ता जोडला आहे. हे दर मान्य झाल्यास कोणत्या कालावधीपासून देण्यात यावे याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. १५** **विद्यापीठाकडील कार्यरत रोजंदारीवरील तृतीय श्रेणी व चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि मानसेवी अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनवाढीबाबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालातील तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा शिफारशी अमान्य करण्यात आल्या तथापि मानसेवी अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनामध्ये रु.२०००/- ने दि.१/१/२००८ पासून वाढ देण्याचे ठरले.**

**विषय क्र. १६** **दि.८/१०/०७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र. १० नुसार डॉ.सुभाष कदम यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन स्विकारलेल्या अहवालावर निर्णय घेण्यात येईल असे ठरले. त्यानुसार डॉ. सुभाष कदम यांना व्यवस्थापन परिषदेसमोर निमंत्रित करुन आपले म्हणणे मांडण्याची संधी देणेबाबत.**

**ठराव क्र. १६** **डॉ. सुभाष कदम यांनी सादर केलेल्या पत्रातील मागणीनुसार त्यांच्या बाबतीत नेमलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाची प्रत देण्यात आली. तसेच त्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी आगामी व्यवस्थापन परिषदेसमोर बोलविण्याचे ठरले.**

**विषय क्र. १७** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordinance 0.59 प्रमाणे गठीत केलेल्या समितीच्या बैठक दि. २०/१२/२००७ रोजी झाली. सदरच्या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदरच्या शिफारशींना Ordinance 0.59 प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. १७** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबत केलेल्या शिफारशींना Ordinance O.59 प्रमाणे व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. १८** **शिवाजी विद्यापीठाकडून आलेल्या चेंजिस इन स्टाफच्या फॉर्मना दंडाच्या सहशुल्क / विनाशुल्क स्विकारणेबाबत.**

सोलापूर विद्यापीठ अंतर्गत असलेल्या महाविद्यालयानी सन २००३-२००४ मध्ये शिवाजी विद्यापीठाकडे जमा चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेसाठी फॉर्म पाठविलेले होते परंतु सोलापूर विद्यापीठ ऑगस्ट २००४ मध्ये स्थापन झाल्याने सदरचे फॉर्म शिवाजी विद्यापीठाने इकडील कार्यालयाकडे एक महिन्यापूर्वी पाठविलेले आहेत.

सदर फॉर्मला दंडाचे सहशुल्क / विनाशुल्क आकारावे किंवा नाही याबाबत धोरणात्मक निर्णयाबाबत.

**ठराव क्र. १८** **शिवाजी विद्यापीठाकडून आलेल्या चेंजिस इन स्टाफच्या फॉर्मना विनाशुल्क स्विकारण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. १९ प्राचार्य, लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा यांचे पत्र क्र.एलओके/बायो/३०५५ दि.२४/१२/२००७ रोजीचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा यांना क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याने Maharashtra University Act १९९४ Ordinances framed under sec. ५३ of the Act (१९९८) Ordinance O.४४ (iii) नुसार विद्यापीठाने प्रत्येक विद्यार्थ्यांच्या Annual tuition fee Rs.२००००/- per Student या प्रमाणे दंड आकारण्यात आलेला होता. सदरच्या दंडास व्यवस्थापन परिषदेने दि.८/१०/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.२६ अन्वये मान्यता दिलेली आहे. महाविद्यालयाने उपरोक्त पत्रान्वये सदरचा दंडाचा फेरविचार करुन जो कांही दंड असेल तो आम्ही भरण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे.

महाविद्यालयाची सदरची मागणी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. १९ लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा या महाविद्यालयाने मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी खास बाब म्हणून प्रति विद्यार्थी रु.२०००/- दंड आकारण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २० प्राचार्य, के.एन.भिसे कला आणि वाणिज्य महाविद्याला, कुर्डूवाडी यांचे पत्र क्र.केएनबीएसीसीके ३५६७ दि.११/१२/२००७ रोजीचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

के.एन.भिसे कला व वाणिज्य महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयामध्ये जून २००४ पासून नवीन विज्ञान या विद्याशाखेस शासनाने मंजूरी दिलेली होती व विद्यापीठाने बी.एस्सी.भाग १ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्षे २००४-०५ व २००५-०६ या वर्षाकरिता संलग्निकरणाची मान्यता दिलेली होती.

सदरच्या महाविद्यालयामध्ये जून २००५ पासून बी.एस्सी. भाग २ व जून २००६ पासून बी.एस्सी. भाग ३ हे अभ्यासक्रम नैसर्गिक वाढीचे सुरु झालेले होते. सदरच्या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे विहीत कालवधीत विद्यापीठाकडे सादर केलेले नव्हते. सबब, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि. १२/०२/२००७ व पुनश्च दि.०८/१०/२००७ रोजीच्या बैठकीत ठेवला असता व्यवस्थापन परिषदेने शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र.८ प्रमाणे Amended Ord.No.१३० प्रमाणे सदरचे प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत प्रत्येक महिन्याला रु.१०००/- या प्रमाणे दंड भरण्याच्य अटीवर व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेली होती.

सदरच्या ठरावाप्रमाणे महाविद्यालयास विद्यापीठाने पत्र क्र.सोविसो/युटीवाय/ॲफी/१४७/५४७ दि.१५ मे,२००७ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या दंडाची रक्कम रु.६३०००/- इतकी विद्यापीठाकडे जमा करण्याबाबत महाविद्यालयास कळविलेले होते.

महाविद्यालयाने उपरोक्त पत्रान्वये सदरचा दंड माफ करुन रेग्युलर फी आकारणी उपरोक्त पत्रान्वये विनंती केलेली आहे व कमी करुन आकारलेल्या दंडाची रक्कम भरण्यास तयार असल्याचे महाविद्यालयाने कळविलेले आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. २० के.एन.भिसे कला आणि वाणिज्य महाविद्याला, कुर्डूवाडी या महाविद्यालयास खास बाब म्हणून रु.५०००/- दंड आकारण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २१ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयासाठी विशेष कक्ष स्थायी समितीच्या तपासणी पथकाकडून महाविद्यालयाच्या दप्तर तपासणी पथकासाठी केलेल्या प्रवासासाठी प्रवास भत्ते बिले मंजुरीसाठी मान्यतेबाबत.**

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयासाठी गठित केलेल्या विशेष कक्ष स्थायी समितीच्या निर्णयानुसार विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या तपासणी पथकाकडून समक्ष भेटी देवून दप्तर तपासणी केलेली आहे.तरी तपासणी पथकातील श्री. डॉ.एस.बी.जुधळे, सदस्य यांनी दिनांक २२/१/२००७ ते ५/४/२००७ समक्ष भेटी दप्तर तपासणी केलेली आहे.

या प्रवाससंबधीत प्रवास भत्ता बिले सहा महिन्यांच्या कालावधी पेक्षा जास्त उशीराने मंजुरीस विद्यापीठाकडे दिल्याने प्रवासभत्ता बिले अदा करावयाच्या नियमानुसार व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता घेणे आवश्यक आहे. श्री. डॉ.एस.बी.जुधळे, यांचे एकूण ४ बिलांची रक्कम रू २७८१/- इतकी आहे. तरी कृपया वरील प्रमाणे प्रवास भत्ता बिले मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. २१ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयासाठी विशेष कक्ष स्थायी समितीच्या तपासणी पथकाकडून महाविद्यालयाच्या दप्तर तपासणी पथकातील प्राचार्य डॉ. एस. बी. जुंधळे सदस्य यांच्या प्रवासभत्त्याच्या ४ बिलांच्या एकूण रु.२७८१/- या रकमेस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २२ प्रा.वाघचवरे बी.डी. यांचे सन २००६-०७ या सालामध्ये दि.२६ व २७ सप्टेंबर, २००६ दरम्यान डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज येथे झालेल्या स्पर्धेच्या टी.ए.बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :- सन २००६-०७ या सालामध्ये क्रीडा विभागातर्फे बॅडमिंटन या क्रीडा स्पर्धेकरिता प्रा. वाघचवरे बी.डी. यांची निवड समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. सदर ठिकाणी प्रा.वाघचवरे बी.डी. उपस्थित राहिले होते. त्यांचे सन २००६-०७ या सालामध्ये दि.२६ व २७ सप्टेंबर, २००६ दरम्यान डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज येथे झालेल्या स्पर्धेच्या टी.ए.बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

**ठराव क्र. २२ प्रा.वाघचवरे बी.डी. यांचे सन २००६-०७ या सालामध्ये दि.२६ व २७ सप्टेंबर, २००६ दरम्यान डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज येथे झालेल्या स्पर्धेच्या प्रवास भत्त्याच्या बिलाची एकूण रु.४४४/- रकमेस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. २३ जून २००९ पासून शासनाने नवीन महाविद्यालय, विषय, तुकडी, विद्याशाखा, नैसर्गिक वाढ यांचे प्रस्ताव महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशी मान्यतेसाठी.**

**(सोबत यादी जोडली आहे.)**

(टिपणी :- महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीची बैठक दि.२२/१२/२००७ रोजी झाली सदरच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे शिफारशी करण्यात आल्या.

१. सोलापूर विद्यापीठाकडून जून २००८ पासून बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस. व एम.एड. या अभ्यासक्रमाच्या नवीन महाविद्यालय, नवीन तुकडी, नवीन विद्याशाखा, यांचे शै.वर्षे २००८-०९ साठीचे प्राप्त झालेले प्रस्ताव व त्यांचे संपूर्ण शुल्क संस्थेस परत दयावे. सदरच्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक निकष तयार करण्याचे असल्याने शिफारस करु नये व शासनाकडे पाठवू नये अशी शिफारस महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने केलेली आहे.
२. सोलापूर विद्यापीठाच्या बृहत आराखड्या व्यतिरिक्त नवीन महाविद्यालयासाठी

प्राप्त झालेल्या प्रस्तावांना शासनाकडे कायदयातील तरतूद महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(१)(२) व महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. बैठक/२००६/(५२७/०६)मशि - ३ दि.२९ डिसेंबर, २००६ अन्वये शिफारस करु नये व प्रस्ताव शासनाकडे पाठवू नयेत असे आदेश दिले असल्याने बृहत आराखड्यात नसलेल्या प्रस्ताव पूर्ण शुल्कासहीत परत पाठवावे लागणार आहेत.

३. व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रोजेक्ट रिपोर्ट असणे आवश्यक आह.

तसेच, सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे परिशिष्ट - अ व तक्ता अ,ब,क व ड प्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत सदरच्या सोबत शिफारशी व प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.)

**ठराव क्र. २३** **जून २००९ पासून नवीन महाविद्यालय, विषय, तुकडी, विद्याशाखा, नैसर्गिक वाढ यांचे प्रस्ताव तसेच महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशींना खालील दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**
**१) पान क्र. २४८ वर, "क्र.३५ - विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते - वाणिज्य - बी.सी.एस. भाग २ - ८० - शिफारस आहे" असा समावेश करावा.**

**विषय क्र. २४** **समन्वयक, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व विभाग यांचे मानधनात वाढ करण्याबाबत.**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाकडील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व विभाग या विभागाकडे डॉ. आर. एन. जाधव समन्वयक म्हणून काम पहात आहेत. त्यांना रु.३५००/- इतके मानधन दरमहा दिले जाते. सदरचे मानधन फारच कमी आहे. तसेच डॉ. आर. एन. जाधव यांचे मानधन रु.३५००/- ऐवजी रु.५०००/- करावेत असे डॉ. श्रीमती व्ही.जे. नाईकनवरे, अधिष्ठाता, समाजशास्त्र विद्याशाखा यांनी सुचविले. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. २४** **डॉ. आर. एन. जाधव, समन्वयक, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व विभाग यांचे मानधन रु.३५००/- ऐवजी रु.५०००/- दि. १ एप्रिल २००८ पासून करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
**स.भा.चौधरी**
**क.लिपीक, सभा विभाग**

सही/-
**एम.एस.शेजूळ**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

सही/-
**बी. पी. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**